**मे. अंबुजा सिमेंट्स लिमिटेड या कंपनीद्वारे दहेगांव-गोवारी भूमिगत कोळसा खाणीच्या विकास आणि संचालनासाठी एकुण १५६२ हेक्टर क्षेत्रफळामध्ये १ दशलक्ष टन प्रतीवर्ष उत्पादनाकरीता प्रस्तावित प्रकल्पाची दि. १०/०९/२०२५ रोजी घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत्त.**

******

केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाची अधिसूचना दि.१४.०९.२००६ व सुधारीत अधिसूचना दि. ०१.१२.२००९ अन्वये मे. अंबुजा सिमेंट्स लिमिटेड या कंपनीद्वारे दहेगांव-गोवारी भूमिगत कोळसा खाणीच्या विकास आणि संचालनासाठी एकुण १५६२ हेक्टर क्षेत्रफळामध्ये १ दशलक्ष टन प्रतीवर्ष उत्पादनाकरीता प्रस्तावित प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी दिनांक १०/०९/२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता प्रकल्पाचे प्रस्तावित स्थळ मे. अंबुजा सिमेंट्स लिमिटेड, दहेगांव-गोवारी भूमिगत कोळसा खाण, खसरा क्र. ९०, वलनी, ता.नागपूर (ग्रामीण), जि.नागपूर येथे श्री. अनुप खांडे, अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. श्रीमती. हेमा देशपांडे, प्रादेशिक अधिकारी, नागपूर ह्या म.प्र.नि.मंडळाचे प्रतिनिधी तथा लोक सुनावणी समितीच्या सदस्या म्हणून उपस्थित होत्या व श्रीमती. धनश्री पाटील, उप-प्रादेशिक अधिकारी, नागपूर-१ यांनी समन्वयक म्हणून काम केले व अध्यक्षांच्या संमतीने पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीची कार्यवाही सुरू केली. पर्यावरण विषयक लोक सुनावणीच्या वेळी उपस्थित असलेल्या नागरीकांच्या नावांची यादी सोबत जोडली आहे. (**सहपत्र-१**).

## पार्श्वभूमी

मे. अंबुजा सिमेंट लिमिटेड या कंपनीद्वारे दहेगांव-गोवारी भूमिगत कोळसा खाणीच्या विकास आणि संचालनासाठी एकुण १५६२ हेक्टर क्षेत्रफळामध्ये १ दशलक्ष टन प्रतीवर्ष प्रस्तावित प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीकरिता अर्ज म.प्र.नि.मंडळ, मुख्यालय, मुंबई येथे दि.१६/०७/२०२५ रोजी इमेलद्वारे सादर केलेला होता. त्या अनुषंगाने मंडळाच्या मुख्यालयाने पत्र क्र. MPCB/JD(WPC)/ENV-PH/B-२५०७१६ -FTS-०१९७ दि. १६/०७/२०२५ अन्वये जनसुनावणीची प्रक्रिया सुरू करण्याबाबत निर्देश प्रदान केले होते (**सहपत्र-२**).

## प्रयोजन व कार्यपध्दती

मे.अंबुजा सिमेंट्स लिमिटेड यांच्या प्रस्तावित दहेगांव-गोवारी भूमिगत कोळसा खदानिची पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी दि. १०/०९/२०२५ रोजी प्रकल्पाच्या प्रस्तावित स्थळावर आयोजीत करण्यात आली. मा.अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी यांच्या सूचनेनुसार प्रादेशिक अधिकारी, नागपूर यांनी उपस्थितांचे स्वागत करून लोकसुनावणीला सुरवात केली.

प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नागपूर यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाची अधिसूचना क्र. **SO 60 (E) dtd. 27th Jan. 1994** व सुधारणा दिनांक १४ सप्टेंबर, २००६ नुसार लोकसुनावणी घेण्याचे प्रयोजन विशद आहे असे नमुद केले. तसेच त्यामधील तरतुदीनुसार दिनांक ०७/०८/२०२५ ला दैनिक हितवाद (इंग्रजी) व दैनिक लोकमत (मराठी) या दोन मोठ्या प्रमाणात वितरीत होत असलेल्या स्थानिक वृत्तपत्रात या पर्यावरण विषयक लोकसुनावणीबद्दल जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात आली आहे असे कळविले. वृत्तपत्रांत प्रसिध्द झालेल्या सुचनांच्या कात्रणाची प्रत सोबत जोडली आहे. (**सहपत्र-३**).

भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचने प्रमाणे पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तसेच प्रकल्पाची ठळक वैशिष्ठे असलेल्या संक्षिप्त अहवाल (इंग्रजी व मराठी मध्ये) व इतर माहिती असलेले कागदपत्रे विविध सरकारी कार्यालयात तसेच ग्रामपंचायत कार्यालयात ३० दिवसापूर्वी नागरीकांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आलेले होते. जाहिर सूचना प्रसिध्द झाल्यापासून जाहिर सुनावणीच्या तारखे पर्यंत परिसरातील लोकांकडून लिखीत स्वरूपात सूचना, टीका-टिप्पणी व आक्षेप मागविण्यात आलेले होते. जाहीर लोकसुनावणीच्या अनुषंगाने एकुण १७६४ निवेदन ईमेलद्वारे व लेखी स्वरूपात (**सहपत्र-४अ**). तसेच ग्रामपंचायत वलनी, खंडाळा, तोंडाखैरी (बेल्लोरी) व दहेगांव यांच्याकडून १० ठराव (**सहपत्र-४ब**) म.प्र.नि.मंडळाकडे प्राप्त झाले असुन प्रत सोबत जोडण्यात येत आहे. मंडळाचा आदेश क्र. ई-५८/२०२५ पत्र क्र. BO/JD/(WPC)/PH/B-250813-FTS-0003 dtd. 13/08/2025 नुसार लोक सुनावणी समिती गठीत करण्यात आली. या आदेशाची प्रत सोबत जोडत आहे (**सहपत्र-५**).

प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ यांनी जाहिर लोकसुनावणी घेण्याबाबतचा उद्देश व त्याची कार्यपध्दती समजावून सांगितली. या जाहिर लोक सुनावणीमध्ये घेण्यात येणाऱ्या आक्षेपांची नोंद घेणे व शासनास पाठविणे एवढेच काम ही समिती करेल. तसेच या ठिकाणी प्रकल्पाच्या परवानगी बाबतचा कोणताही निर्णय घेण्यात येणार नाही असे स्पष्ट केले.

लोकसुनावणी दरम्यान प्रस्तावना म.प्र. नि मंडळाच्या अधिकाऱ्यांमार्फत झाल्यानंतर उपस्थित नागरिकांना मुद्दे,आक्षेप,सूचना इ. मांडण्याबाबत सूचना केली. तसेच लोकसुनावणीचे अध्यक्ष श्री. अनुप खांडे तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, नागपूर, यांनी सुद्धा उपस्थित नागरीकांस आपले म्हणने मांडण्याबाबत सुचित केले. उपस्थित जनप्रतिनिधी व नागरीकांनी प्रस्तावित प्रकल्पाबाबत तिव्र रोष/विरोध व्यक्त केला. सदर बाब लक्षात घेता मा.अध्यक्षांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी थांबविण्याबाबतचा निर्णय घेऊन तसे उपस्थित जनप्रतिनिधी व सर्व नागरीकांना कळविले.

परंतु उपस्थित जनप्रतिनिधी व सर्व नागरीकांनी सदर जनसुनावणी थांबवण्याबाबत विरोध दर्शवला व जनसुनावणी संपवण्याबाबत निर्णय घेण्यास मागणी केली. तसेच इतिवृत्त लेखी स्वरूपात तात्काळ देण्याबाबत मागणी केली. त्या अनुषंगाने म.प्र.नि.मंडळाच्या अधिकाऱ्यांनी जनसुनावणी स्थळावर इतिवृत्त तयार केल्यानंतर मा.अध्यक्षांनी जनप्रतिनिधी व उपस्थित नागरीकांच्या समोर इतिवृत्ताचे वाचन केले (**सहपत्र-६**). मा.अध्यक्षांनी सर्व नागरीकांचा तसेच परिसरातील ग्रामपंचायतींच्या ठरावासह विरोध असल्याची नोंद करून घेत लोकसुनावणी संपविण्यात येत आहे असे जाहीर केले.

(हेमा देशपांडे)
सदस्या, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, नागपूर

(धनश्री पाटील)
समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, नागपूर-१

(अनुप खांडे)
अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, नागपूर